अनुभूतींच्या विविध रंगांचे रसाळ कोलाज : माझे कथाविश्व

ज्योतिर्मय साहित्य

जगण्यातील साधेपणा जेव्हा शब्दांचे बोट धरून कागदावर उतरतो, तेव्हा माझे कथाविश्व सारखी एक नितांत सुंदर साहित्यकृती आकारास येते. श्रीमती जयश्री लेंभे लिखित आणि मुद्रिका कमर्शिअल प्रिंटर्स (शुक्रवारपेठ) तर्फे प्रकाशित झालेला हा कथासंग्रह म्हणजे केवळ कथांचा पुंजका नसून, मानवी स्वभावाच्या, नातेसंबंधांच्या आणि भावभावनांच्या विविध छटांचे एक देखणे शब्दविश्व आहे. लाभलेले सुबक मुखपृष्ठ (स्वराली लेंभे) आणि मा. किसन चौधरी सरांची पुस्तकाविषयीची उत्सुकता वाढवणारी अभ्यासपूर्ण प्रस्तावना पुस्तकाच्या सौंदर्यात भर घालते. लेखिकेचे छोटेखानी पण प्रगल्भ मनोगत वाचकाला या विश्वात प्रवेश करण्यासाठी उद्युक्त करते.

दैनंदिन जीवनातील तत्त्वज्ञान आणि मिश्कील निरीक्षण यातून साकारलेल्या या संग्रहातील कथांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे लेखिकेची विलक्षण निरीक्षणशक्ती. निर्मलाची पाककृती मधील खुसखुशीतपणा असो वा आजीची शाळा मधील त्या इवल्याशा बाळाने दिलेली आर्त साद प्रत्येक गोष्ट थेट काळजाला भिडते. भैरवनाथ प्रसन्न* आणि *मान न मान में तेरा मेहमान (मांजराच्या रूपातील पाहुणीची कथा) या कथांमधून लेखिकेचा मिश्कील आणि हसता-हसता अंतर्मुख करणारा स्वभाव दिसून येतो. समज आणि वेडी माणसं या कथा मानवी मनातील गैरसमज आणि स्वभावातील विक्षिप्तपणाचे अचूक पण तितकेच सहानुभूतीपूर्वक चित्रण करतात.

संस्कार, कर्तव्य आणि भावनांचा त्रिवेणी संगम

दीर्घकाळ शिक्षण क्षेत्रात



घालवलेल्या आदर्श मुख्याध्यापिकेचे संस्कारक्षम पैलू सत्वपरीक्षा, २५ नंबरचा विद्यार्थी आणि चांदण्यातली

चांदी या कथांमधून प्रकर्षाने जाणवतात. विद्यार्थ्यांबद्दलची प्रामाणिक आपुलकी आणि नातवंडांवर होणारे मूल्यांचे संस्कार वाचकाच्या मनावर गारुड करतात. कौटुंबिक जिव्हाळ्याचे दर्शन घडवणारी कोटाची कोपरी आणि प्रत्येक गृहिणीला स्वतःचा शोध घ्यायला लावणारी मैत्रिणीची गोष्ट म्हणजे रखमी या कथा कौटुंबिक मूल्यांची वीण घट्ट करतात.

परमेश्वरी अधिष्ठान आणि अध्यात्माची प्रचिती

लेखिकेच्या संवेदनशील मनाला लाभलेली अध्यात्माची जोड पुस्तकाला एक वेगळीच उंची देते. वारी पंढरीची*, अतर्क्य (अपघातातून आजोबांचे बरे होणे), आणि विठ्ठला पांडुरंगा* या कथांमधून विठ्ठलनामाचा गजर आणि परमेश्वरी अस्तित्वाची प्रचिती वाचकाला भारावून टाकते. मेडिटेशन सारख्या गंभीर विषयावर स्वतःचीच गंमत सांगत लेखिकेने मांडलेले जीवन जगण्याचे मोठे तत्त्वज्ञान कौतुकास्पद आहे.

ऋतूंचे आणि आठवणींचे सोहळे

दिवाळीच्या फराळाची पंगत डोळ्यांसमोर उभी करणारी फराळ ही काव्यात्मक कथा आणि आठवणीतील दिवाळी, आठवणीतला पाऊस या रचना वाचकाला स्वतःच्याच बालपणात आणि भूतकाळात घेऊन जातात, जिथे वाचकही त्या आठवणींच्या पावसात चिंब भिजून निघतो. आनंदाचा चष्मा चढवून मस्त आनंदी राहण्याचा संदेश देणाऱ्या आणि येन केन प्रकारेण मधून संस्कृत श्लोकांचा मतितार्थ सोप्या भाषेत मांडणाऱ्या कथा संग्रहाची समृद्धी वाढवतात.

अनुभवावर आधारित सुंदर कथाविश्व!

साध्या सोप्या भाषेचे आत्मियता वाढवणारे लेखनविश्व!

वाचकांचा मूड आनंदी करणारे एक नितांत सुंदर शब्दविश्व!

वाचकांना खिळवून ठेवणारे ''माझे कथाविश्व''!

माझे कथाविश्व हे पुस्तक वाचताना केवळ पानांवरचे शब्द वाचल्याचा भास होत नाही, तर लेखिकेसोबत एका समृद्ध प्रवासाला निघाल्याचा अनुभव येतो. साधी, ओघवती आणि मनाला भिडणारी भाषा, प्रसंगांची जिवंत गुंफण आणि सकारात्मक शेवट ही या पुस्तकाची वैशिष्ट्ये आहेत. वाचकाचा मूड क्षणात आनंदी करण्याचे आणि त्याला खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य या पुस्तकात आहे. प्रत्येक रसिकाने संग्रही ठेवावे आणि आवर्जून वाचावे असे हे एक उत्तम कथाविश्व आहे!

चिन्हांच्या गर्दीत हरवणारे शब्द

मुकुंद भालेराव, छत्रपती संभाजी नगर
विद्युतसंदेशसंकेतसूत्र –
bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाष्यक्रमांक – ८३० ८८ ३५३ १३



शब्दब्रह्म शब्दांचे तत्त्वज्ञान (भाग - ५)

ज्योतिर्मय साहित्य

आपण अधिक बोलावे, अधिक लिहावे आणि अधिक शब्द वापरावेत, यामागे केवळ व्यवहाराचा विचार नाही; त्यामागे आपल्या भारतीय तत्त्वज्ञानाचीही भक्कम पार्श्वभूमी आहे.

माझ्या माहितीप्रमाणे, संस्कृत आणि मराठी (प्राकृत) भाषांच्या संदर्भात शब्दांच्या स्वरूपाचा अत्यंत सखोल विचार ज्यांनी केला, त्यामध्ये महाकवी भर्तृहरी यांचे स्थान अग्रक्रमाचे आहे. त्यांच्या वाक्यपदीय या ग्रंथात त्यांनी शब्दब्रह्म ही अद्वितीय संकल्पना मांडली आहे. आपण ''अन्न हे पूर्णब्रह्म'' असे म्हणतो; त्याचप्रमाणे ''शब्द हे ब्रह्म आहेत'' ही संकल्पनाही भारतीय भाषादर्शनात तितकीच महत्त्वाची मानली गेली आहे.

वाक्यपदीयच्या ब्रह्मकांडातील पहिलाच श्लोक या विचाराचा पाया स्पष्ट करतो

अनादिनिधनं ब्रह्म शब्दतत्त्वं यदक्षरम्
।विवर्ततेऽर्थभावेन प्रक्रिया जगतो यतः ।।

या श्लोकाचा आशय असा की, ज्याला आरंभ नाही, अंत नाही, ज्याची झीज होत नाही, ते शब्दतत्त्व म्हणजेच ब्रह्म होय. याच शब्दरूप ब्रह्मापासून विविध अर्थांची निर्मिती होते आणि त्यातूनच जगातील सर्व व्यवहार घडत असतात.

अशा या शब्दांचे महत्त्व आपल्या परंपरेने इतके उंचावून ठेवले; पण आज आपणच त्या शब्दांना बाजूला सारत आहोत. कारण एकच, शब्दांऐवजी चित्र, चिन्ह किंवा इमोजीद्वारे व्यक्त होणे अधिक सोपे वाटते, परंतु हे सोपे वाटणे वरवरचे आहे, कारण त्या प्रकारच्या अभिव्यक्तीत पूर्णता नसते. अनेकदा आपल्या स्वतःलाही ती अपूर्णता जाणवत नाही. उलट, आपण त्या अपूर्ण अभिव्यक्तीलाच पूर्ण संवाद समजून बसतो आणि तेथेच खरी दिशाभूल सुरू होते.

प्रत्यक्ष बोलताना शब्दांची निर्मिती मनात होते, विचारांना आकार मिळतो आणि ते शब्द ओठांमधून बाहेर पडतात. लिहितानाही हाच प्रवास घडत असतो. फरक एवढाच की, तेव्हा शब्द ऐकू येत नाहीत; ते कागदावर किंवा संगणकाच्या पडद्यावर दिसू लागतात.

पण शब्द उच्चारले गेले नाहीत म्हणून ते अस्तित्वात नसतात, असे नाही. शब्द प्रथम मनात जन्म घेतात. लेखक किंवा वक्ता त्यांना न उच्चारताही अनुभवत असतो. माझ्या मते, हे शब्द कानांना ऐकू येत नसले, तरी मनाला स्पष्ट ऐकू येतात. त्यांची ही अंतःश्राव्यता हा मानवी विचारप्रक्रियेचा अत्यंत सूक्ष्म भाग आहे.

मी याला शब्दांचे अंतःश्रवण म्हणेन. त्या शब्दांची तीव्रता कानांना ऐकू येण्याइतकी नसली, तरी मन त्यांना ओळखते, अनुभवते आणि त्यातूनच पुढे विचार व अभिव्यक्ती जन्माला येते. ही प्रक्रिया केवळ ध्वनीची नसून चेतनेची देखील आहे. त्यामुळे शब्दांचे स्वरूप हे केवळ भौतिक नसून बौद्धिक आणि आध्यात्मिकही आहे.

म्हणूनच शब्दांना बाजूला सारून केवळ चिन्हांवर अवलंबून राहणे म्हणजे अभिव्यक्तीची व्याप्ती स्वतःच मर्यादित करून घेणे होय.

(क्रमशः भाग ६: भाषा समृद्ध कशी होते?)

भरतनाट्यमच्या लक्षवेधी नृत्यानुबंधची अनुभूती

कु. अनुभूती बॅनर्जीचे मनमोहक भरतनाट्यम अरंगेत्रम (रंगप्रवेश) ठाण्यात संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

संस्कृती अकॅडमी ऑफ फाईन आर्टस् या ठाण्यातील १९९८ पासून कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित सांस्कृतिक संस्थेत १० वर्षांच्या समर्पित प्रशिक्षणाची सुंदर मंगलमय सांगता करणारा कु. अनुभूती बॅनर्जीचा भरतनाट्यम अरंगेत्रम हा बहारदार कार्यक्रम ११ जुलै २०२६ रोजी राम गणेश गडकरी रंगायतन या ठाण्यातील विशाल सभागृहात संपन्न झाला. तिच्या मान्यवर गुरु नाट्याचार्य आशा सुनीलकुमार यांच्या प्रेमळ आणि शिस्तबद्ध मार्गदर्शनाखाली गेले एक वर्ष अनुभूतीने या नृत्यपदार्पणाद्वारे रंगप्रवेशासाठी कसून मेहनत केली होती. अनुभूतीसोबत तिच्या नृत्यसख्या अग्रणी मिश्रा आणि नेहा भट यांच्यासोबत जुळलेले तिचे लक्षवेधी नृत्यानुबंध संपूर्ण कार्यक्रमात दिसून येत होते. भरतनाट्यम हा तामिळनाडूतील अभिजात नृत्यप्रकार असूनही अनुभूतीला त्यात आत्यंतिक रुची असल्याने दाक्षिणात्य भाषेतील गीतसंगीताचे अडसर तिला कधीच जाणवले नाहीत. अभिमानाची गोष्ट म्हणजे या नृत्याचे प्रशिक्षण घेत असतांना याच वर्षी आयसीएसई बोर्डाच्या १० वीच्या परीक्षेचे कठीण आव्हान लीलया पेलत अनुभूती ९६ % टक्के गुण मिळवीत उत्तीर्ण झाली.

भरतनाट्यम या शब्दाची उत्पत्ती बघितल्यास भा हे अक्षर भाव (भावाभिव्यक्ती) दर्शवते, रा म्हणजे राग (सुरसंगीत), आणि ता म्हणजे ताल (लय आणि ताल) आणि नाट्यम (नृत्य) हा तामिळनाडूचा नृत्यप्रकार आहे. साक्षात नटराजाचे तांडव आणि पार्वतीदेवीचे लास्य यांच्यापासून प्रारंभ झालेला हा नृत्यप्रकार आजतागायत असंख्य नर्तक-नर्तिकांनी जतन केला आहे. शिष्या जेव्हा गुरूच्या मार्गदर्शनाखाली नृत्याभ्यास करून पर्याप्त नृत्यकौशल्य ग्रहण करते तेव्हाच गुरु तिला किंवा त्याला एकल मंचप्रवेशाची म्हणजेच अरंगेत्रम सादर करण्याची परवानगी देतात. नृत्याभ्यासाची ही महत्वाची पायरी ओलांडल्यावर शिष्य स्वतंत्रपणे नृत्य कार्यक्रम सादर करतो.

अनुभूतीच्या अरंगेत्रममध्ये भरतनाट्यम नृत्याचे सर्व मूलभूत प्रकार समाविष्ट करण्यात आले होते. प्रारंभी श्रीगणेशाचे स्तवन केल्यानंतर शारदास्तवन झाले. यात शांता शेळके यांच्या लोकप्रिय जय शारदे वागीश्वरी या मराठी गीतावर तिन्ही मुलींचा भरतनाट्यमचा नादमधुर आविष्कार प्रेक्षकांना खूप भावला. महाराष्ट्र आणि तामिळनाडूचे हे फ्युजन कल्पनातीत होते.

तिघींचे दुसरे अत्यंत कुशल नृत्य होते जतीस्वरम. हा शुद्ध नृत्यप्रकार असून यात विविध जती अर्थात लहान लहान लयबद्ध रचनांचे तुकडे आणि स्वरांची जोड असते. यात नर्तिकेचे लय, तंत्र आणि अवकाशीय रचनेवरील प्रभुत्व दिसून येते. कथानक नसल्याने इथे अभिनयाला महत्व नसते, परंतु सर्व भर नर्तकाच्या हालचालींच्या लावण्यमय प्रस्तुतीवर आणि स्वर व तालाच्या परस्पर समन्वयावर केंद्रित असतो.

तिसरे नृत्य होते आदि जगद्गुरु श्री शंकराचार्य भागवतपाद यांनी लिहिलेल्या ''शिव पंचाक्षरमंत्र स्तोत्र'' याचे सादरीकरण! यात भगवान शिवाच्या शारीरिक सौंदर्याचे विस्तृत वर्णन आहे. तसेच या रचनेचे वैशिष्ट्य हे आहे की, प्रत्येक श्लोकाचे पहिले अक्षर नमः शिवाय या नामातील न, म, शि, व आणि य या अक्षरांपासून सुरु होते. यातील गंगावतरण, देवी सतीचा आत्मदाह आणि शिवशंकराने प्राशन केलेल्या हलाहलाचे शिवलीलेचे हृद्य प्रसंग तिघी कलावतींनी उत्कटतेने सादर केले. वर्णम करतांना हा चौथा नृत्यप्रकार सादर कसोटी शिष्येच्या प्रशिक्षणाची हे लागते. अरंगेत्रममध्ये वर्णम सर्वाधिक आव्हानात्मक मध्यवर्ती स्थानावर विराजमान असते, कारण यात दोन आवश्यक पैलू एकत्र येतात नृत्त, म्हणजेच शुद्ध नृत्य, आणि अभिनय, म्हणजेच भावनांची अभिव्यक्ती साकारणारे चित्रण आणि प्रभावशाली कथाकथन. या कथा बहुदा पारंपारिक असतात. इथे शारीरिक क्षमता आणि भावनिक परिपक्वता या दोन्हींत नर्तिका आपले कौशल्य संपूर्णतः प्रदर्शित करते. या अरंगेत्रममध्ये प्रेक्षकांना भगवान विष्णूच्या विविध अवतारांची

झलक बघायला मिळाली. अनुभूतीने धारण केलेला नरसिंहावतार प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून गेला. तसेच गजेंद्रमोक्षाच्या प्रसंगात तिने सादर केलेली मगर अतिशय वास्तववादी वाटली. यासोबतच तिघींनी वामनावतार, अहल्याउद्धार, कृष्णाद्वारे अर्जुनाला गीतोपदेश आणि पद्मनाभ-स्तुती सारखे प्रसंग आपल्या नृत्याभिनयाने अक्षरशः जिवंत केले.

मध्यंतरात अनुभूती, तिचे पालक श्री उज्ज्वल आणि श्रीमती आरती बॅनर्जी यांच्यासोबत अन्य शिष्या आणि त्यांच्या पालकांद्वारे माननीय गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनीलकुमार आणि प्रशिक्षण देणाऱ्या संस्कृती अकादमीच्या शिक्षिका यांचा टाळ्यांच्या गजरात सत्कार करण्यात आला. गायक/ गायिका (श्री कृष्णमूर्थी आणि कु. कीर्थना), मृदंगम (श्री दक्षिणामूर्थी), व्हायोलिन (श्री बालसुब्रमण्यन) बासरी (श्री भास्कर नागराजन) आणि घटम (कु. विभा विश्वेश्वरन) या सहयोगी कलाकारांसोबतच पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना, मेकअप, वेशभूषा, केशभूषा इत्यादीत योगदान देणाऱ्या सहकाऱ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. मान्यवर गुरु आशाजींनी तिघी मुलींना प्रशिक्षणाची दीपशिखा सदैव प्रज्वलित ठेवण्यासाठी सुंदर समया भेट म्हणून दिल्या आणि प्रमाणपत्रे दिली. या हृद्य सत्कारसमारंभात श्रीमती आशा सुनीलकुमार यांनी आपले मनोगत व्यक्त करीत त्यांच्या लाडक्या विद्यार्थिनींना यापुढेही भरतनाट्यम या कलेचे प्रशिक्षण सुरु ठेवणे किती महत्वाचे आहे यावर भर दिला. अनुभूतीच्या पालकांनी या समर्पित गुरूंप्रती मनापासून आभार व्यक्त केले.

मध्यंतरानंतर तिन्ही मुलींना एकल नृत्य सादर करण्याची उत्तम संधी मिळाली. अनुभूतीने बंगभूमीत सर्वप्रिय अशा महिषासुरमर्दिनीच्या अवतारावर आधारित 'दुर्गास्तुती' हे बंगाली नृत्य सादर केले. दुर्गास्तुतीच्या अंतर्गत देवीची त्रिगुणी रूपे (सत्व- सरस्वती, रज- लक्ष्मी आणि तम- पार्वती) अनुभूतीने आपल्या अनुपमेय अभिनयाने प्रकट केली. ब्रह्मा, विष्णू, महेश आणि देवादिकांनी प्रदान केलेली विविध आयुधे धारण केलेली शक्तीरूपी दुर्गादेवी एका अंगाने आणि गर्वाने मदोन्मत्त झालेला महिषासुराचे रूप दुसऱ्या अंगाने धारण करीत नऊ दिवसांच्या घनघोर युद्धाच्या प्रसंगी अनुभूतीने प्रकट केलेल्या क्रोधाग्नीने प्रेक्षक रोमांचित झाले. तिने मृत्तिकेची पारंपरिक धूपपात्रे हातात घेत दुर्गापूजेच्या प्रसंगीचे प्रसिद्ध बंगाली धनुची नृत्य सादर केले तेव्हा प्रेक्षागारात टाळ्यांचा कडकडाट झाला. अनुभूतीच्या नृत्यकलेच्या या परमावधीने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

✍
डॉ. मीना श्रीवास्तव ठाणे.
मो. 99201 67211



इतर एकल नृत्यप्रकारांत नेहाने कृष्णावतारातील आणि अग्रणीने रामायणातील प्रसंग सादर केले.

थिल्लाना हा तिघी कलावतींनी सादर केलेला नृत्यप्रकार प्रेक्षकांना आनंदाचे अत्युच्च क्षण देता झाला. हिंदुस्थांनी शास्त्रीय संगीतातील 'तराना' भरतनाट्यममध्ये 'थिल्लाना' म्हणून प्रसिद्ध आहे. कार्यक्रमाचा समारोप करतांना हा अत्यंत किचकट असा गुंतागुंतीचा शुद्ध नृत्यप्रकार (नृत्त) सादर केल्या जातो. इथे नृत्यसंगीतातील नैपुण्य नर्तिकेच्या क्लिष्ट पदन्यासातून आणि मनोहर मुद्रांमधून प्रतिबिंबित होते. हे नृत्य म्हणजे आनंद आणि सुखाच्या परमोच्च बिंदूचे प्रतीक समजल्या जाते. 'थिल्लाना' या नृत्यात अनुभूतीच्या थिरकत्या पदन्यासाला तोड नव्हती. कित्येक वर्षांची तिची अथक नृत्यसाधना याद्वारे दृश्यमान होत होती. या नेत्रदीपक सादरीकरणानंतर अनुभूती आणि तिच्या सख्यांनी श्रीरामप्रभूची स्तुती करीत 'मंगलम' प्रस्तुत केले. यावेळी त्यांनी भगवान नटराज, इतर देवादिक, त्यांच्या गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनीलकुमार, संगीत साथीदार आणि प्रेक्षकांना नृत्याद्वारे विनयपूर्वक वंदन केले.

हा अभूतपूर्व कार्यक्रम संपन्न झाला तरी नर्तिकांच्या सन्मानार्थ उभे राहिलेल्या प्रेक्षकांच्या टाळ्यांचा गजर थांबत नव्हता. ग्यालरीसकट गडकरी सभागृह प्रेक्षकांनी इतके तुडुंब भरले होते की कांहींना उभे राहूनच हा कार्यक्रम बघावा लागला. कार्यक्रमात अनुभूतीला शुभाशीर्वाद देण्यास आणि तिचे अभिष्टचिंतन करण्यास तिचे नातेवाईक, इष्टमित्र-मैत्रिणी आणि तिच्या पालकांचे शुभचिंतक आवर्जून मोठ्या संख्येने हजर होते. या अविस्मरणीय सादरीकरणाद्वारे प्रेक्षकांना अलौकिक अनुभव देणाऱ्या अनुभूती बॅनर्जी या युवा कलावतीचे सर्व स्तरातून अमाप कौतुक होत आहे. तिला तिच्या पुढील शिक्षण तसेच कलाप्रशिक्षणासाठी अनेकानेक शुभेच्छा!